# असिफावर १० जणांनी अत्याचार केला यातही राजकारण आणि धर्म आणणार?

**संपादकीय**

**जयश्री खाडिलकर-पांडेकृत**

अत्याचार हा अत्याचार असतो. त्याला जात, धर्म तर नसतोच. पण त्याचे राजकारणही होऊ शकत नाही आणि होऊ द्यायचे नाही. ही बाब ठणकावून सांगण्याची वेळ आली आहे. कोर्टालाही सांगणे आहे की, सत्ता आणि संपत्तीच्या जोरावर न्यायाची फरफट होताना स्पष्ट दिसते तेव्हा कोर्टाने वेगाने हस्तक्षेप करायला हवा. सर्व पुरावे पुसून गेल्यावर जाग आली तर त्याचा उपयोग नाही.

भारतात कठुआ आणि उन्नाव या दोन ठिकाणी झालेल्या अत्याचाराची वृत्तं रोज येत आहेत. या अत्याचारांचा तर संताप येतोच, पण मेंदू सुजलेल्या सैतानी राजकारण्यांचाही संताप येतो. ज्या दोन मुलींवर क्रूर अत्याचार झाले त्यांना न्याय मिळाला पाहिजे. त्या नराधमांना फाशी झालीच पाहिजे. आम्हा सर्वांना ही फाशी बघायची आहे. न्याय झालेला बघायचा आहे.

जम्मू-काश्मीरच्या कठुआ जिल्ह्यातील रसाना भागात बकरवाल हे अत्यंत गरीब कुटुंब राहत होते. गुरं चरायची आणि मजुरी करायची इतकेच त्यांचे जगणे होते. या बकरवाल समुदायाला गावातून हटविण्यासाठी निवृत्त महसूल अधिकारी सांझीराम याने गावात दहशत पसरविण्याचा निर्णय घेतला. ही दहशत पसरविण्यासाठी त्याने या समुदायातील आठ वर्षांच्या निष्पाप असिफाचे अपहरण केले. तिला बेशुद्ध केले. त्यानंतर सांझीरामचा अल्पवयीन भाचा, त्याचा मित्र परवेश कुमार (मन्नू), सांझीरामचा मुलगा विशाल, दीपक या सर्वांनी आळीपाळीने त्या लहानग्या जीवावर अत्याचार केले. यात डोक्याला झिणझिण्या येतील असे क्रौर्य होते. असिफाचे अपहरण केल्यावर सांझीरामच्या भाच्याने सांझीरामच्या मुलाला फोन केला आणि असिफावर अत्याचार करायला ये म्हणून त्याला मीरठहून बोलावून घेतले. ज्या दीपकला तिला ठार करण्यासाठी नंतर बोलावले तो म्हणाला की, तिला ठार करायचेच आहे तर मीही तिच्यावर अत्याचार करतो. दीपकने अत्याचार करून नंतर असिफाचा गळा आवळला.

हा भयानक प्रकार त्या गावातील मंदिरात सुरू होता. असिफाचे कुटुंब तिचा शोध घेत होते. पण त्यांनी मंदिरात तिला शोधलेच नाही. तिचे वडील म्हणाले की, मी रोज त्या मंदिराजवळून जायचो. पण इतक्या पवित्र ठिकाणी असे काही घडेल, असे मला कधीच वाटले नाही. ज्या नराधमांनी हे भयंकर कृत्य केले त्यांच्याविरुद्ध सर्वांनी एकत्र येऊन या गुंडांना पकडून न्याय मागायला हवा होता. त्याऐवजी या घटनेला हिंदू-मुस्लीम रंग दिला, जातीचा भेद पुढे आला. असिफाची बाजू मांडणाऱ्या वकिलाला बार कौन्सिलच्या अध्यक्षांनी धमकावले. या प्रकरणात एफआयआर दाखल करू नका अशी भयानक मागणी करीत वकिलांनी मोर्चा काढला. सांझीरामला अटक करू नका अशी भाषणं भाजपा आमदार काल सिंग आणि प्रकाश चंदर गंगा यांनी केली. हे काय चालले आहे? आपल्या मुलांकडे कुणी वाईट नजरेने बघितले तरी त्याचा खून करावा, इतके आपले रक्त खवळते. आणि इथे तर असिफाच्या मृत्यूचे राजकारण मांडले आहे. तिची हत्या जानेवारीत झाली. एप्रिल उजाडला तरी न्याय नाही. असिफाचं कुटुंब भयभीत होऊन रसाना परिसर सोडून अज्ञात स्थळी पळून गेले आहे. तिच्यावर अत्याचार करणाऱ्या प्रत्येकाला फाशी आणि या नराधमांना पाठिंबा देणाऱ्या प्रत्येकाला जन्मठेप झालीच पाहिजे. या अत्याचाराला हाच न्याय आहे.

कठुआत झाले ते भयंकर होते. तसेच उन्नाओत घडले. एका अल्पवयीन मुलीवर भाजपाचा आमदार कुलदीप सेनगर याने अत्याचार केला आणि त्यानंतर पोलीस आणि या आमदाराने दहशतीचे थैमान सुरू केले. त्या मुलीचे वडील न्याय मागायला आले, तेव्हा त्यांना पळवून नेऊन बेदम मारहाण केली. रक्तबंबाळ झालेला पिता पोलीस स्थानकात बसला होता, आमदाराच्या भावाने मला मारले असे सांगत होता तेव्हा समोर बसलेला पोलीस अधिकारी दात काढून हंसत होता. त्या रक्तबंबाळ पित्याला रुग्णालयात नेले नाही. त्याला तसेच कोठडीत टाकले आणि त्या रात्रीच त्याला मृत्यू झाला. या आमदार सेनगरने त्या पीडित मुलीच्या काकालाही इतके धमकावले की, काका अज्ञातस्थळी पसार झाला. आमदाराच्या विरोधात पोलीस एफआयआर घ्यायला तयार नाहीत, त्याला चौकशीला बोलवायलाही तयार नाहीत. अनेक दिवस हा तमाशा सुरू होता. शेवटी एकदाचे कोर्ट जागे झाले. सीबीआयने आता चौकशी सुरू केली. पण ही चौकशी म्हणजे फार्स ठरू शकते. कारण पुरावे नष्ट केलेले असणार आहेत आणि इतक्या दहशतीनंतर कुणी साक्षीदार पुढे येईल असे वाटत नाही. या प्रकरणात न्याय मिळाला नाही तर ते फार मोठे दुर्दैव असेल. सत्ता आणि संपत्तीच्या उन्मादावर न्यायालय हेच जालीम औषध आहे. प्रशासन कमकुवत ठरत असेल तर न्यायालयानेच आता न्यायदानासाठी वेळेत पुढाकार घ्यावा.